INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No. MH-659/13(N)
www.vmsindia.org

# 'स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी'

**पाटील रा. ह.**
गोपालकृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर (म.रा.) भारत
Email: *raosahebpatil4012@gmail.com*

**सारांशः** स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये कादंबरी हा वाङ्मयप्रकार समृद्धीला आला होता, विस्तारीत झाला होता. त्याच्या कक्षा रूंदावल्या होत्या. म्हणूनच आपल्याला स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये कादंबरी वाङ्मयामध्ये अनेक प्रवाह दिसतात. प्रादेशिक कादंबऱ्या, ऐतिहासिक कादंबऱ्या, पौराणिक कादंबऱ्या, चरित्रात्मक कादंबऱ्या, ग्रामीण कादंबऱ्या, संज्ञाप्रवाही कादंबऱ्या असे अनेक प्रवाह आणि प्रवृत्ती स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीत आढळतात. परंतु असे असले तरी या काळातील कादंबरीवर फडके–खांडेकरांचा प्रभाव नाकारता येत नाही. रंजनवादातून ती पुरेशी बाहेर आल्याचे दिसत नाही. या संदर्भात डॉ. रवींद्र ठाकुर लिहितात, '' 'सुनीता', 'एल्गार' सारख्या कादंबऱ्यातून फाळणीमुळे झालेल्या सामाजिक अस्वस्थतेचे चित्रण आले आहे. 1950–60 पर्यंत मराठी कादंबरीवर फडके–खांडेकर–माडखोलकर यांच्या रंजनप्रधान रचनातंत्राचा प्रभाव होता. नव्या अनुभवविश्वाचा वेध घेऊ पाहणारे र. वादिघ्यांसारखे लेखकही या रचनातंत्राच्या प्रभावापासून अलिप्त राहू शकले नाहीत. 'आई आहे शेतात' ही त्यांची वेगळ्या वळणाची कादंबरी आहे. गो. नी. दांडेकर व श्री. नापेंडसे यांची कादंबरीही तंत्रदृष्ट्या रूढ मळवाट टाळू शकली नाही.

**बिज शब्द** : कादंबरी, सामाजिक बदल, जीवनवादी, औद्योगिकीकरण, बकालपणा

**प्रस्तावना :**

'स्वातंत्र्यप्राप्ती' ही अत्यंत महत्वाची घटना भारतीय समाजजीवनात घडली. स्वातंत्र्याचा इष्ट परिणाम सर्वच क्षेत्रात जाणवला तसा तो साहित्य क्षेत्रातही जाणवलाअनेक
कारणांमुळे स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी साहित्यातील चेहरा–मोहरा बराच बदललेला आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक परिस्थितीत झालेल्या बदलांचे इष्टानिष्ट परिणाम भारतीय समाजजीवनावरही मोठ्या प्रमाणावर झाले. औद्योगिकरण वाढले. यंत्रयुगाचा परिणाम सामान्य माणसाच्या जीवनावरही जाणवू लागला. शहरे फुगू लागली, त्यांचे महानगरात रूपांतर होण्याला गती प्राप्त झाली. नवकथा आणि नवकविता यातून हे परिणाम आविष्कृत होऊ लागले. एकूणच स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्यावर गांधीवाद, मार्क्सवाद, ग्रामसुधारणा, दुसरे महायुद्ध, भारतीय स्वातंत्र्य,
सार्वत्रिक शिक्षणप्रसार, पं. नेहरूंच्या पंचवार्षिक योजना, पाश्चात्य वाङ्मयीन प्रवाहांचा वाढता परिचय, बदलते समाजजीवन, औद्योगिकरण, यंत्रयुग, महानगरातील बकालपणा इत्यादी घटकांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मोठा प्रभाव पडला आहे. मराठी कादंबरी याला अपवाद नाही. वरील घटनांचा दूरगामी परिणाम मराठी कादंबरीवरही पडला. १९४५ नंतर मराठी कादंबरीने आत्मनिष्ठ आणि जीवनवादी दृष्टिकोनातून परंतु कलात्कतेचे भान ठेवून ग्रामीण जीवनातील विविध व्यथा, वेदना आणि समस्या चित्रित केल्याप्रादेशिकतेची चौकट मोडून ग्रामीण वास्तवाचा आविष्कार कादंबरीतून घडू लागला
पध्दत– संदर्भ ग्रंथ

**विवेचनः**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर एक वेगळेच चित्र समाजामध्ये डोळ्यासमोर येते. देश स्वतंत्र झाला होता. स्वातंत्र्यप्राप्तीचे ध्येय पूर्ण झाले होते. जीवनातील एक इप्सित पूर्ण झाल्याचा आनंद होता. स्वातंत्र्यपूर्व काळातील कलावंतांच्या डोळ्यासमोर स्वातंत्र्यप्राप्तीचे एकच ध्येय होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र चित्र वेगळे दिसते. अनेक घटना आणि गोष्टी प्रकाशात येऊ लागल्या. राष्ट्रीय, सामाजिक, सांस्कृतिक बदल घडताना दिसू लागले. राष्ट्रीय योजना आखल्या जाऊ लागल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारतासाठी राज्यघटना निर्माण केली. तिचा स्वीकार झालाप्रजासत्ताक राज्य उदयास आले. स्वतंत्र भारताने लोकशाही राज्यप्रणाली स्वीकारलीपं. जवाहरलाल नेहरू यांनी पंचवार्षिक योजना आखून देशाला विकासाचे स्वप्न दाखविले. स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मूल्यांची देशभर समाजात रूजवणूक होवू लागली. ती व्हावी अशी रास्त अपेक्षा निर्माण झाली. ग्रामीण विकासाच्या योजना आखून कृषी क्षेत्राला प्रगतीच्या दिशा दाखविण्यात आल्या. एका बाजूला औद्योगिकतेला महत्त्व दिले जावू लागले. यांत्रिकीकरणाचा प्रभाव वाढला. षहरांनाही एक वेगळे महत्त्व प्राप्त होऊ लागले. समाजातील आणि समाजजीवनातील व त्यांच्याशी संबंधित असलेल्या सर्वच क्षेत्रातील ठराविक वर्गाची मिरासदारी संपुष्टात आली. या सगळ्यांबरोबरच फ्रॉईड–युंग अशा शास्त्रज्ञांच्या विचारांचा प्रभाव पडून वरिष्ठ वर्गातील आणि सामान्य वर्गातील माणूस नव्याने विचार करू लागला. स्वातंत्र्योत्तर काळातील या सर्व घटना, घडामोडींनी सबंध समाजजीवन ढवळून निघाले. त्याचा परिणाम साहित्य क्षेत्रावर झाला. राजकीय आणि सामाजिक बदलांबरोबरच सांस्कृतिक बदल घडणे अपरिहार्यच होते. वाङ्मयातही परिवर्तनाने वेग घेतला. जुने संकेत मोडून नवकथा व नवकविता निर्माण केली, तर कथेमध्ये गंगाधर गाडगीळांनी बदल घडवून नवकथा निर्माण केली. परंतु कादंबरी वाङ्मयात असा ठळक बदल कोणी घडविला नसला तरीही स्वातंत्र्योत्तर कादंबरीत लक्षणीय बदल झाले. वरील वैशिष्ट्यांमुळे स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कादंबरी वाङ्मयात वेगळेपण आढळते. नायक, नायिका, वातावरण, शैली अशा

पद्धतीने रचल्या जाणाऱ्या पारंपारिक कादंबरीपेक्षा, ही कादंबरी वेगळी होऊ लागली. जीवनातील कुतूहल तिच्यात निर्माण झाले. एखाद्या विषयावर कादंबरी लिहिण्यापेक्षा प्रत्यक्ष जीवनानुभवाचाच कलात्मक आविष्कार करण्याकडे तिचा जास्त कल दिसतो. माणसाचे, स्वत:शी, इतरांशी आणि निसर्गाशी असलेले संबंध अधिक नेमकेपणाने या कादंबरीत अवतरतात. जीवनातील गुंतागुंतीची, व्यामिश्रतेची जाणिवही अधिक तीव्र झाल्याचे दिसते. लेखक आणि वाचक यांच्यातील संबंध आजवर महत्वाचा मानला गेला, पण त्याऐवजी लेखक आणि त्याचा अनुभव हा संबंध महत्वाचा मानला जाऊ लागला. स्वातंत्र्योत्तर काळातील कादंबरीविषयी डॉ. नंदा मेश्राम लिहितात, ''या कालखंडातील कादंबरी (स्वातंत्र्योत्तर कालखंड) एकाचवेळी वर्तमानाला सामोरी जाणारी आणि त्याचबरोबर विरोधी अशा भूतकाळाकडे झेपावणारी दिसते. अनेक थरांतील नागरिकांना सामावून घेणाऱ्या विशाल समाजाचे स्वरूप तिला प्राप्त झाले आहे. मराठी कादंबरीचे अनुभव क्षेत्र या काळात खूपच विस्तारले. अभिजातवाद, वास्तववाद, अतिवास्तववाद इत्यादी प्रवाहसुद्धा याच काळात उदयाला आले.''[1] एकूणच या काळातील कादंबरीला व्यक्तिनिष्ठ आणि समाजनिष्ठ असे पदर निर्माण झाले. मनोविश्लेषण करणाऱ्या कादंबऱ्या लिहिल्या जाऊ लागल्या. संज्ञाप्रवाही कादंबऱ्यांचा उदयही याच काळात झाला. या विषयी डॉ. सुशील ढगे लिहितात, ''स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सांस्कृतिक प्रबोधनाचे मधल्या काळातील सुटलेले जे धागे होते, त्यांची एकत्र गुंफण करणे महत्वाचे होते. खेड्यांच्या जीवनाकडे कादंबरीचे लक्ष जाणे अपरिहार्य होते. खेड्यातील जीवनाच्या गुंतागुंतीच्या प्रश्नावर प्रकाश टाकणे हे स्वत:चे कर्तव्य मानून कादंबरी लिहिण्यास सुरूवात झाली. बहुतेक कादंबऱ्यात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच प्रादेशिकता, वर्गीय भिन्नता तसेच आर्थिक विषमता हे विषय आढळतात. या काळातील लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे माणसाशिवाय लेखनाला आधार मिळणे शक्य नाही याची जाण असल्याचे दिसते. तरीही संज्ञाप्रवाहाशी कादंबरी स्थिरावली.''[2] स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये कादंबरी हा वाङ्मयप्रकार समृद्धीला आला होता, विस्तारीत झाला होता. त्याच्या कक्षा रूंदावल्या होत्या. म्हणूनच आपल्याला स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये कादंबरी वाङ्मयामध्ये अनेक प्रवाह दिसतात. प्रादेशिक कादंबऱ्या, ऐतिहासिक कादंबऱ्या, पौराणिक कादंबऱ्या, चरित्रात्मक कादंबऱ्या, ग्रामीण कादंबऱ्या, संज्ञाप्रवाही कादंबऱ्या असे अनेक प्रवाह आणि प्रवृत्ती स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीत आढळतात. परंतु असे असले तरी या काळातील कादंबरीवर फडके—खांडेकरांचा प्रभाव नाकारता येत नाही. रंजनवादातून ती पुरेशी बाहेर आल्याचे दिसत नाही. या संदर्भात डॉ. रवींद्र ठाकुर लिहितात, '' 'सुनीता', 'एल्गार' सारख्या कादंबऱ्यातून फाळणीमुळे झालेल्या सामाजिक अस्वस्थतेचे चित्रण आले आहे. मात्र 'पाणकळा' ने दाखविलेली विकसनशील दिशा, बी. रघुनाथ आणि मर्ढेकर यांच्या कादंबरीतून प्रकट झालेले युद्धोत्तर समाजवादाचे भान या गोष्टी जमेला धरूनही आणि पेंडसे, दांडेकर यांचे योगदान मान्य करूनही मराठी कादंबरीची नवी

पहाट उजाडायला १९६० पर्यंत वाट पाहवी लागली आहे. एरवी मराठी कादंबरी अजूनही फडके—खांडेकरी रंजनवादाच्या साखर झोपेतच आहे.''३ परंतु हे खरे असले

तरी या कळात पु. भा. भावे, र. वा. दिघे, श्री. ना. पेंडसे, गो. नी. दांडेकर, बा. सीमर्ढेकर, वि. वा. हडप, श्री. रा. बिवलकर, व्यंकटेश माडगूळकर आदी समर्थ कादंबरीकारांनी फडक्यांचा रंजनवाद झुगारून सामाजिक वास्तववादी कादंबरीलेखन केले आहे[5]'गानलुब्धा मृगनयना' (१९४७) र. वा. दिघे, 'भारतमाते उठ' (१९४७) वि. वाहडप, 'मांडवी तू आटलीस' (१९४७) लक्ष्मणराव सरदेसाई, 'सुनीता' (१९४८), श्री. राबिवलकर, 'पाणी' (१९४८) बा. सी. मर्ढेकर, 'एल्गार' (१९४९) श्री. ना. पेंडसे, 'हद्दपार' (१९५०) श्री. ना. पेंडसे, 'बळी' (१९५०) विभावरी शिरूरकर, 'दीपस्तंभ' (१९५०) गीता साने, 'चित्रा' (१९५१) अण्णा भाऊ साठे, 'अकुलीना' (१९५१) पु. भा. भावे, 'भारतमाता की जय' (१९५१) वि. वा. हडप, 'गारंबीचा बापू' (१९५२) श्री. ना. पेंडसे, 'जान्हवी'(१९५२) वि. वा. शिरवाडकर, 'घर' (१९५२), वसंत कानेटकर, 'क्षिप्रा' (१९५४) शरच्चंद्र मुक्तिबोध, 'आडगावचे चौधरी' (१९५४) बी. रघुनाथ, 'बनगरवाडी' (१९५५) व्यंकटेश माडगूळकर, 'पवनाकाठचा धोंडी' (१९५५) गो. नी. दांडेकर, 'पडघवली' (१९५५) गो. नीदांडेकर, 'आई आहे शेतात' (१९५६ र. वा. दिघे, 'कल्पनेच्या तीरावर' (१९५६) वि. वाशिरवाडकर,

'माणुसकीची हाक' (१९५७) शंकरराव खरात, 'कुणा एकाची भ्रमणगाथा' (१९५७) गो. नी. दांडेकर, 'पड रे पाण्या !' (१९५८) र. वा. दिघे, 'माचीवरला बुधा' (१९५८), गो. नी. दांडेकर, 'पूर्णामायची लेकरं' (१९५८) गो. नी. दांडेकर, 'फकिरा' (१९५९) अण्णा भाऊ साठे, 'वैजयंता' (१९५९) अण्णा भाऊ साठे, 'बारी' (१९५९) रणजित देसाई, 'ययाति' (१९५९) वि. स. खांडेकर, 'धग' (१९६०) उद्धव शेळके, 'माझा गाव' (१९६०) रणजित देसाई, 'डोंबाऱ्याचा खेळ' (१९६०) भाऊ पाध्ये इत्यादी कादंबऱ्यांनी स्वातंत्र्योत्तर कालखंडात (१९४७ ते १९६०) आपल्या अस्तित्वाचा स्वतंत्र ठसा उमटविलेला आहे.

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर काळात बा. सी. मर्ढेकर यांनी कादंबरी वाङ्मयात अमूलाग्र बदल घडवून आणला. 'रात्रीचा दिवस' (१९४२), 'तांबडी माती' (१९४३), 'पाणी' (१९४८) अशा संज्ञाप्रवाही कादंबऱ्या लिहून मर्ढेकरांनी मानवी मनातील संज्ञाप्रवाह समर्थपणे चितारला. त्यावरून मराठीत नवकादंबरीचे जनकत्व मर्ढेकरांकडेच जाते. र. वा. दिघे हे या काळातील एक यशस्वी कादंबरीकार आहेतग्रामीण जीवनाची नेमकी नस पकडणारा कादंबरीकार म्हणून त्यांचा उल्लेख केला जातो. ग्रामीण पार्श्वभूमी लाभलेल्या 'पाणकळा' (१९३९), 'सराई' (१९४३), गानलुब्धा मृगनयना' (१९७४), 'आई आहे शेतात'

(१९५६), 'पड रे पाण्या' (१९५८), 'कार्तिकी' (१९६६) इत्यादी कादंबऱ्या लिहून मराठी कादंबरीला त्यांनी दिलेले योगदान नाकारता येत नाही. र. वा. दिघे यांच्या कादंबऱ्या बहुचर्चित असल्या तरी त्या फडकेप्रणित तंत्रवादाला शरण गेलेल्या दिसतात. स्वातंत्र्योत्तर काळात दोन महत्वाचे कादंबरीकार आहेत, जी ज्यांनी प्रादेशिक कादंबरीच्या प्रवाहाला एक नवी दिशा दिली. श्री. नापेंडसे व गो. नी. दांडेकर या दोन ज्येष्ठ कादंबरीकारांनी प्रादेशिक कादंबरीला काही नवी परिमाणे प्राप्त करून दिली. १९४९ साली 'एल्गार' ही श्री. ना. पेंडसे यांची कादंबरी प्रसिद्ध झाली आणि त्यांचा कादंबरीकार म्हणून जसा उदय झाला त्याचप्रमाणे तो प्रादेशिक कादंबरीतला समर्थ आविष्कार ठरला. साखरपेंडी, दापोली, हर्णे, मुर्डी, आंजर्ली परिसरातील कोकणचा निसर्गसमृद्ध प्रदेश तेथील मानवी जीवनासह प्रभावीपणे चित्रित केल्यामुळे प्रादेशिक कादंबरीकार म्हणून पेंडशांची प्रतिमा निर्माण झाली. 'एल्गार' (१९४९) ही कोकणातल्या साखरपेंडी या खेड्यात घडणारी रघु आणि कादर या दोन सुशील जिवांची प्रेमकथा आहे. दोघांचे धर्म व सांस्कृतिक संचित वेगवेगळे असले तरी स्वभावगत सहिष्णुतेमुळे ते एकमेकांचे सच्चे मित्र आहेत. 'हद्दपार' (१९५०) मध्ये अनेक विद्यार्थ्यांच्या मतावर स्वाभिमानाचे संस्कार करणाऱ्या राजेमास्तरांची जीवनकहाणी पेंडशांनी सांगितली आहे. राजेमास्तरांविषयी लेखकाचा अतीव भक्तिभाव कादंबरीत सतत डोकावत राहतो. 'गारंबीचा बापू' (१९५२) या कादंबरीत बापूच्या अफाट कर्तृत्वाची कथा ते सांगतात. बापू हा नपुंसक विठोबाची पत्नी यशोदा हिला अण्णा खोतापासून झालेला मुलगा वेगळ्या स्वरूपाच्या कौटुंबिक वातावरणामुळे एक वेगळा बापू घडत जातो. पेंडशेंच्या इतर कोणत्याही कादंबरीपेक्षा या कादंबरीला अधिक लोकप्रियता मिळाली आहे. पुढे 'हत्या' (१९५४), 'रथचक्र' (१९६२) अशा त्यांच्या महत्वाच्या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. कोकणच्या जीवनाचे समर्थ चित्रण करणारे लेखक म्हणून श्री. ना. पेंडसे यांना रसिकांची मान्यता मिळाली. त्यांच्या प्रादेशिक कादंबरीला नवे बळ मिळाले यात काही शंका नाहीगो. नी. दांडेकर हे या काळातील आणखी एक महत्वाचे कादंबरीकारबहुविध स्वरूपाची विपुल साहित्यनिर्मिती करणारे लेखक म्हणून दांडेकर प्रसिद्ध आहेत कलंदरवृत्तीने भटकंती करून विविध अनुभव गाठीशी बांधून वास्तववादी लेखन त्यांनी केले. मुळातच त्यांचा पिंड संस्कारक्षम आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीने दिलेल्या मूल्यांवर त्यांची अतूट श्रद्धा आहे. त्या मूल्यांची पडझड होत चाललेली पाहून ते व्यथित होतात. प्राचीन भारतीय ग्रामव्यवस्था विकल झालेली पाहून त्यांना 'पडघवली' (१९५५) सूचते, तर जुनी ग्रामव्यवस्था टिकविण्याची धडपड करणारा 'पवनाकाठचा धोंडी' (१९५५) कादंबरीचा नायक होतो. वैभवशाली गतकाळाची पूजा करणे हा त्यांचा मनोधर्मच आहे. ते शिवकाळातील समाजवास्तवाचा वेध घेत असोत वा समकालीन सामाजिक वास्तवाचा वेध घेत असोत, त्यांचे मन गतकाळातच रमलेले असते. 'शितू' (१९५३) या कादंबरीमुळे ते कादंबरीकार म्हणून साहित्यसृष्टित ओळखले जाऊ लागलेसात्विक, सोशीक, बालविधवा शितू आणि बेदरकार परंतु अंतर्यामी प्रेमळ विसू यांच्या विफल प्रीतीची ही करुणोदात्र शोककथा आहे. शितू—विसूची दिव्य प्रेमकथा कोकणातील पार्श्वभूमीवर घडते. अखेरीस शितू परंपरावादी समाजव्यवस्थेची बळी ठरते. प्राचीन काळापासून चालत आलेली ग्रामीण समाजव्यवस्था उद्धवस्त होत चाललेली पाहून दांडेकर अस्वस्थ होतात व यातून 'पडघवली' (१९५५) सारखी कादंबरी लिहिली जाते. प्राचीन समाजव्यवस्था आदर्श होती हे गृहीत धरूनच त्यांनी या कादंबरीचे लेखन केले आहे. अंबूवहिनीच्या मुखातून दांडेकरांनी ही कहाणी सांगितली आहे. तिचे गावात येणे, घरावर, गावावर मायेची पाखर घालणे, तरीही पडघवलीचे उध्वस्त होत जाणे हा सर्व वृत्तांतही या कादंबरीची विषयवस्तू आहे. 'पवनाकाठचा धोंडी' या कादंबरीत त्यांनी बदलत्या परिस्थितीच्या पुराबरोबर वाहत जायचे नाकारणाऱ्या एका झुंजार माणसाची कथा सांगितली आहे. आपली परंपरा जपणाऱ्या माणसांना धोंडी आवडतो. वाडवडिलांनी घालून दिलेली परंपरा पुढे चालविण्यात त्याला आनंद वाटतो. जग बदलले तरी तो बदलायला तयार नाहीजुन्या परंपरा सांभाळण्यात कुठलीच तडजोड करायला तो तयार नाहीविभावरी शिरूरकर यांची 'बळी' (१९५०) ही स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मैलाचा दगड ठरलेली कादंबरी. या कादंबरीचे आशय निखालस वास्तववादी आहे, तसेच शैलीतंत्रही. पानवडच्या खोऱ्यातील गगनवाडी, तिथले गुन्हेगार समजले जाणारे मांग, गारुडी. आबा हा त्याचा उद्धारकर्ता नायक. त्याच्या स्वप्नांचा आणि त्याचाही दारूण शेवट की शेवट म्हणजे अनावर जाणिवांचे उड्डाण आहे. ही कादंबरी तथाकथित गुन्हेगार वस्तीच्या बदलत्या टप्प्याचा वेध घेणारी सामाजिक कादंबरी आहे वि.वा. शिरवाडकरांची 'कल्पनेच्या तीरावर' ही कादंबरी द्रष्टेपणाचे एक स्वरूप सूचित करणारी आहे. सामाजिक वास्तवाचे काही एक प्रकारचे अर्थपूर्ण आकलन करण्याचा प्रत्येक कादंबरीकारांचा प्रयत्न असतो. अशा अर्थपूर्ण आकलनाच्या प्रक्रियेतील एक प्रकार म्हणजे कल्पित अशा समांतर वास्तवाची निर्मिती करणे. 'कल्पनेच्या तीरावर' या कादंबरीत एका कल्पित अशा समांतर वास्तवाचे चित्र पाहण्याचा व दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. व्यंकटेश माडगूळकरांनी माणदेशी जीवनवास्तव उत्कटतेने चित्रित केले. माडगूळकरांच्या साहित्यातील व्यक्तींचा विचार त्यांच्या भोवतालच्या प्रादेशिक पर्यावरणाला टाळून करताच येणार नाही. 'बनगरवाडी' (१९५५) ने प्रादेशिक कादंबरीचा एक नवा मानदंड निर्माण केला. कादंबरीतील सर्व व्यक्तिरेखा हाडामासाच्या आणि माणदेशाच्या मातीतल्या वाटतात. राजाराम सौदंणीकर बनगरवाडीचा कायापालट करतात पण निसर्गापुढे ते ही हतबल होतात. निसर्ग आणि मानवी जीवन यांचे एकात्म रसायन या कादंबरीत घडून आले आहे. निसर्गातील घडामोडी येथील जीवनात निर्णायक बदल घडवून आणतात. मराठी कादंबरी विश्वात अण्णा

भाऊंचे नाव अनेक दृष्टीने वाखाणण्यासारखे आहे. 'फकिरा' (१९५९) ही त्यांची सर्वात जास्त लोकप्रिय ठरलेली कादंबरी. लोकजीवन, लोकसंस्कृति, खेड्यातील गावगाडा बलुतेदार आणि गाव—कामगार यांचे संबंध याचे समर्थ चित्रण या कादंबरीत आढळते. तसेच इंग्रजाविरूद्ध दलितांनी आपल्या अस्मितेसाठी पुकारलेला लढाही प्रभावी होऊन या कादंबरीतून प्रकट होतो. या कादंबरीविषयी मधुकर वाकोडे लहितात, ''लोकमानसातील इतिहासाला साहित्याचे रूप देणारी 'फकिरा' ही पहिली प्रादेशिक कादंबरी मानावी लागते. ''४ लोकमानसातील इतिहास फकिरात आविष्कृत झाला आहे. इंग्रजी आमदानीत फकिराने वारणेच्या खोऱ्यात जी बंडखोरी केली, राणोजीने गावासाठी कटून मरण्याचा जो चितथरारक पराक्रम केला, त्याची दखल लिखित इतिहासाने घेतली नाही. मात्र लोकमानसाने या पराक्रमी पुरुषांना आपल्या ह्रदयसिंहासनावर बसविले आणि त्यांच्या पराक्रमाच्या लोककथा बनविल्या पराक्रम पूजा हा लोकमानसाचा स्वभाव असतो. आपल्या गावात बापू खोताचा हात तलवारीसकट कलम करणारा फकिरा आणि आयाबहिणींची अब्रू वाचविण्यासाठी वाघासारखा धावून जाणारा सत्याबा हे लोककथांचे विषय बनले. ग्रामीण भागातील हे लोकमानस या कादंबरीच्या आशयाचा कणा आहे. रणजित देसाई यांच्या 'बारी' (१९५९) ने ग्रामजीवनाचे वास्तववादी चित्रण केले आहे. तर वि. स. खांडेकरांच्या 'ययाति' (१९५९) ने पौराणिक कादंबरीचा पाया भक्कम करण्याचा प्रयत्न केला. उद्धव शेळके यांची 'धग' (१९६०) ही कादंबरी अनेक अर्थाने लक्षणीय आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्याशी धैर्याने दोन हात करणाऱ्या असंख्य स्त्रियांचे प्रतिनिधित्व 'धग' मधील कौतिक करते. कौतिक ही एक अविस्मरणीय व्यक्तिरेखा आहे. तिरसट सासरा, संसारात लक्ष नसणारा नवरा आणि मनाप्रमाणे न वागणारा मोठा मुलगा यांच्या कचाट्यात सापडलेली व अंतिमत: भ्रमिष्ट झालेली कौतिक वाचकाला अस्वस्थ करून सोडते. याच काळात भाऊ पाध्ये यांनी महानगरीय जीवनवास्तव रेखाटायला सुरूवात केली. एका विशिष्ट साचेबंद आशयसूत्रातून भाऊ पाध्ये यांनी मराठी कादंबरीला मुक्त केले. त्यांच्या कादंबऱ्यातून मुंबईच्या जीवनाचे विविध पदर चित्रित झालेले आहेत. 'डोंबाऱ्याचा खेळ' (१९६०) या कादंबरीत भाऊ पाध्ये कामगारांच्या हितासाठी निर्माण झालेल्या संघटना, संघटनेमार्फत उभी राहणारी चळवळ एखादी व्यक्ती आपल्या व्यक्तिगत स्वार्थासाठी, मूलभूत कामप्रवृत्तीच्या पूर्तीसाठी कशी वापरते याचे प्रत्ययकारी चित्रण करतात. त्याचबरोबर कामगार संघटनांचे प्रत्यक्ष काम, चळवळीतील अंतकलह, स्पर्धा या साऱ्यात सामान्य कामगारांची होणारी फरफट यांचे चित्रण ते करतात

**निष्कर्श:**

स्वातंत्र्योत्तर कादंबरी विविध प्रवृत्ती आणि प्रवाहांना जन्म देणारी ठरली आहे. या कादंबरीतील वृत्ती—प्रवृत्तीचे मूळ स्वातंत्र्योत्तर काळातील, महायुद्धोत्तर काळातील अस्वस्थ वातावरणात सापडते. पण १९५०—६० पर्यंत मराठी कादंबरीवर फडके—खांडेकर—माडखोलकर यांच्या रंजनप्रधान रचनातंत्राचा प्रभाव होता. नव्या अनुभवविश्वाचा वेध घेऊ पाहणारे र. वा. दिघ्यांसारखे लेखकही या रचनातंत्राच्या प्रभावापासून अलिप्त राहू शकले नाहीत. 'आई आहे शेतात' ही त्यांची वेगळ्या वळणाची कादंबरी आहे. गो. नी. दांडेकर व श्री. ना. पेंडसे यांची कादंबरीही तंत्रदृष्ट्या रूढ मळवाट टाळू शकली नाही. तथापि 'पडघवली' मध्ये नवतेची बीजे दृगोच्चर होतात. 'बनगरवाडी' ही नव्या जाणिवेची समर्थ चाहूल होती. 'पाणी' (बा.सी. मर्ढेकर), 'बळी' (विभावरी शिरूरकर), 'गारंबीचा बापू' (श्री. ना. पेंडसे), 'पवनाकाठचा धोंडी' (गो. नी. दांडेकर), 'फकिरा' (अण्णाभाऊ साठे), 'धग' (उद्धव शेळके), 'बारी' (रणजित देसाई), 'ययाति' (वि. स. खांडेकर), 'डोंबाऱ्याचा खेळ' (भाऊ पाध्ये) आदि कादंबऱ्यामध्ये नव्या जाणिवांचा अचूक वेध आविष्कृत झाला आहे.

**संदंर्भ:**

१) मेश्राम नंदा, 'दलित कादंबरी—स्वरूप व समीक्षा', डिंपल पब्लिकेशन, मुंबई, प्रआ. २००६, पृ. क्र. ४८

२) ढगे सुशीला, 'मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल', 'सुगावा प्रकाशन, पुणे', प्र. आ. २००४, पृ. क्र. ६६—६७.

३) ठाकूर रवींद्र, 'मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा', दिलीपराज प्रकाशन प्रा. लि. पुणे, प्र. आ. २००७, पृ. २४६

४) वाकोडे मधुकर, 'प्रतिष्ठान', जानेवारी १९८१, पृ. क्र. २६.

*******